■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३१९ ■ बुधवार दि.६ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 319 ■ Wednesday Dt. 6 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# धनंजय मुंडेंना मंत्रीपद देऊन बीड जिल्ह्यातील विकासाचे दार उघडा, जनतेचा आवाज..!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**बीडच्या विकासाची दिशा अजितदादांच्या निर्णयावर अवलंबून; संपूर्ण राज्याचे लक्ष केंद्रित**

# अजितदादा.. बीडला न्याय द्या, धनंजय मुंडेंना मंत्रीपद देऊन विकासाची गती वाढवा!

## विकासाची चावी धनंजय मुंडे यांच्या हातात; धनंजय मुंडेंशिवाय बीडचा विकास अशक्य, जनतेची एकमुखी मागणी!

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि स्वर्गीय विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नेते धनंजय मुंडे यांना मंत्रीपद देण्याची जोरदार मागणी जिल्ह्यातून होत आहे. जिल्ह्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांवर नेहमीच पुढाकार घेणाऱ्या धनंजय मुंडे यांच्याकडे पुन्हा एकदा जबाबदारी सोपवावी, अशी मागणी कार्यकर्ते, जनतेसह स्थानिक नेते मंडळी करत आहेत. धनंजय मुंडे यांनी मागील काळात बीड जिल्ह्यात रस्ते, आरोग्य, सिंचन, शिक्षण अशा विविध क्षेत्रांत ठोस कामगिरी केली आहे. त्यामुळेच जिल्ह्याच्या भविष्यासाठी आणि अपूर्ण राहिलेल्या विकास कामांना गती देण्यासाठी त्यांच्यासारख्या सक्षम नेतृत्वाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही अनेकदा धनंजय मुंडे यांच्या कार्याची पावती दिली आहे. आता पुन्हा एकदा त्यांच्यावर मंत्रीपदाची जबाबदारी देऊन बीड जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची मागणी उचल खाऊ लागली आहे. मंत्रिमंडळ विस्ताराच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील जनतेचे लक्ष अजित पवार यांच्या निर्णयाकडे लागले आहे. धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात स्थान देऊन त्यांच्या नेतृत्वात जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलला असून विकासाची नवी दालने उघडली आहेत. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या नेतृत्वावर पुन्हा विश्वास दाखवावा, अशी मागणी जिल्हाभरातून होत आहे. धनंजय मुंडे हे केवळ राजकारणी नाहीत तर जनतेचे खरे प्रतिनिधी मानले जातात. त्यांनी केलेली विकासकामे मग ती ग्रामीण रस्त्यांची असोत की पाणीप्रश्नासंदर्भातील उपाय योजना, लोकांच्या लक्षात राहिलेली आहेत. बीड जिल्हा मागास भाग म्हणून ओळखला जात असतानाच मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे इथे अनेक प्रकल्पांची मुहूर्तमेढ रोवली गेली.

राज्य सरकारच्या आगामी मंत्रिमंडळ विस्तारात बीडचा आवाज बुलंद व्हावा यासाठी कार्यकर्ते, युवक, महिला आणि शेतकरी वर्ग यांच्याकडून सोशल मीडियावर मोठा पाठिंबा दिला जात आहे. धनंजय मुंडे बीडचा विकास ही संकल्पना आता जनतेच्या मनात बिंबली आहे. त्यामुळेच त्यांच्या मंत्रीपदाची घोषणा लवकर व्हावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. राजकारणापेक्षा जनतेचा विकास महत्त्वाचा असल्याचे अजित पवार वारंवार सांगतात. त्यामुळेच बीडकरांना आशा आहे की, या जनतेच्या आवाजाला त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत धनंजय मुंडेंना मंत्रीपद बहाल करील. राजकीय वर्तुळात देखील या मागणीची जोरदार चर्चा असून, बीड जिल्ह्याच्या भवितव्यासाठी हा निर्णय निर्णायक ठरणार आहे. स्थानिक पातळीवरुनही विविध सामाजिक संघटनांनी आणि नागरिकांनी यासंदर्भात पाठिंबा दर्शवला आहे.

धनंजय मुंडे यांच्यासारख्या कार्यक्षम नेत्या हातात पुन्हा मंत्रीपदाची सूत्रे देऊन बीडच्या विकासाला नवी दिशा आणि गती मिळू शकेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आता याबाबत अजित पवार काय निर्णय घेतात, याकडे बीड जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.



# मातोरी ते भगवानगड रोड वर वाळूने भरलेला टिपर पकडला

### प्रभारी सपोनी राजेश गडवे यांची दुसऱ्या दिवशी ही वाळू तस्करावर कारवाई

**गेवराई । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक नवनीत कावत पोलीस अधीक्षक म्हणून बीड जिल्ह्यात रुजू झाल्यापासून दोन नंबर



वाल्यात बेधडक कारवाई करण्यात येत असून मात्र काही ठिकाणी वाळूची चोरट्या पद्धतीने वाहतूक होत आहे अशीच टाटा कंपनीच्या टिप्पर ने मातोरी ते भगवानगड रोड या ठिकाणी सपोनी राजेश गडवे व त्याच्या टीम सोबत गस्त घालत असताना वाळू ने भरलेल्या टिपर आढळून आला असून ही वाळू नगर जिल्ह्यात जात असताना माहिती मिळाली आहे. सदरील आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्या कडून २५ लाख २० हजार किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, चकलंबा पोलीस ठाणे प्रभारी सपोनी राजेश गडवे आल्या पासुन दोन दिवसात दोन मोठ्या कारवाई अवैध धंद्यावाल्यात केल्या असुन दुसरी कारवाई ही ५ ऑगस्ट रात्री अकरा वाजता अवैध धंदे केसेस कामी सपोनी राजेश गडवे व पोह अमोल

पान २ वर



### कोणी अवैध वाळू करत असेल तर त्याची गय केली जाणार नाही : सपोनी गडवे

प्रभारी पोलीस निरीक्षक राजेश गडवे यांनी पहिल्या दिवशी अवैध वाळू ने भरलेला टेक्टर पकडला तर दुसऱ्या दिवशी पावणे बाराच्या दरम्यान टीपर वाळू ने भरलेला आढळुन आला त्यांच्या या कारवाईमुळे त्याचे स्वागत होत असुन त्यांचीशी संपर्क साधला असता त्यांनी सागितले की, कोणीही बेकायदेशीर मार्गाने अवैध धंदे करत असेल तर त्याची गय केली जाणार नाही. नागरिकांना ही आव्हान केले आपल्या आजू बाजुस असे काही धंदे होत असतील तर पोलिस स्टेशन शी संपर्क साधावा आपले नाव गुप्त ठेवण्यात येईल असे आवाहन प्रभारी सपोनी राजेश गडवे यांनी केले आहे.

# महादेव मुंडे हत्या प्रकरणी माहिती असेल तर कळवा; माहिती देणाऱ्यास बक्षीस देणार!

### एसआयटी प्रमुख आयपीएस पंकज कुमावतांकडून आवाहन

**बीड । प्रतिनिधी**





परळी येथील महादेव मुंडे हत्या प्रकरणी चौकशी करण्यासाठी नेमलेल्या एसआयटी पथकाचे प्रमुख आयपीएस पंकज कुमावत यांनी त्यांचा मोबाईल जाहीर करुन काही माहिती असेल तर कळवा असे आवाहन केले आहे. माहिती देणाऱ्यास बक्षीस देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. महादेव दत्तात्रय मुंडे मुळ रा. भोपला ता. परळी व बँक कॉलनी यांची दि. २१/१०/२०२३ रोजी रात्री ०८.०० ते ९.०० वा. च्या दरम्यान परळी कोर्टासमोरील मोकळ्या

पान २ वर

# चोरी गेलेले टाटा मॅजिक टेम्पो २४ तासाच्या आत जप्त

**माजलगाव ग्रामीण पोलिसांची कार्यवाही**

**माजलगाव । प्रतिनिधी**

आपला टाटा मैजिक टेम्पो हॉटेल समोर लावून चहा पित असताना कोणी तरी अज्ञात आरोपीने टेम्पो पळवून नेल्याची तक्रार फिर्यादी रामेश्वर तिखे यांनी एक दिवस अगोदर दिली होती पोलिसांनी तपास चक्रे फिरून सदरील टेम्पो २४ तासाच्या आत जप्त करून माजलगाव ग्रामीण पोलिस ठाणे येथे लावण्यात आला आहे.

या विषयी सविस्तर वृत्त असे की, रामेश्वर नवनाथ तिखे रापारडी ता रिसोड जी वाशीम हे दि ३ ऑगस्ट २०२५ रोजी आपला टाटा मॅजिक टेम्पो एम एच १३ डिई २६७४ या नंबर चा टेम्पो

पान २ वर



# केजमधील रेणुका कलाकेंद्रावर छापा

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई

**केज । प्रतिनिधी**

दोन पिडीत महिलांची सुटका, एक गुजरातची तर दुसरी बाहेर जिल्ह्यातून आणून वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या दोन पुरुष व एका महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केजमधील सारुळ गाव, केजकडे जाणाऱ्या रोडवर रेणुका कलाकेंद्रा मधे चालणाऱ्या वेश्याव्यवसायावर छापेमारी करण्यात आली आहे. यावेळी दोन पीडीत महिलांची सुटका करुन वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या तिघांवर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

आज रोजी अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, पोलीस ठाणे केज हद्दीत सारुळ गाव येथे रेणुका कलाकेंद्रा मधे दोन महीला बाहेरून आणून वेश्या व्यवसाय करीत आहेत. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी नियंत्रण कक्षाचे पोलीस निरीक्षक देवीदास भागवत गात यांना सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून झख गात व अ.मा.वा.प्र. कक्षाच्या प्रमुख झडख पल्लवी जाधव व त्यांचा संपूर्ण स्टाफ यांनी डमी ग्राहक व पंचासह सदर ठिकाणी सापळा रचून, डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या महिला एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी ७५०० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या महिलेला तिचे नाव गाव विचारले असता, तिने तिचे नाव

पान २ वर



# धोंडराई ग्रामपंचायत कार्यालय अस्वच्छतेमुळे चर्चेत

## कार्यालयाच्या भिंतीवर पिचकाऱ्या पण गुटख्यांची रंगरंगोटी

**गेवराई । प्रतिनिधी**

भिंतीवर थुंकणे ग्रामपंचायत कार्यालय व सार्वजनिक ठिकाणी किंवा इमारतींच्या भिंतींवर थुंकणे. हे एक अस्वच्छ आणि आरोग्यासाठी हानिकारक कृत्य असुन गेवराई तालुक्यातील धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयाच्या मुख्य दरवाजाच्या पाठीमागे, कार्यालयाच्या आवारात पिचकाऱ्या पण गुटख्यांची रंगरंगोटी दुर्गंधी स्वरूपात पाहायला मिळाली. याच इमारतीमधील स्वच्छतागृह व भिंतीवर गुटखा व तंबाखू खाऊन थुंकल्याने भिंती चांगल्याच रंगलेल्या असून त्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. ग्रामपंचायत कार्यालय अस्वच्छतेच्या विळख्यात असल्याने भिंती सर्वत्र गुटक्याच्या पिचकारीने रंगल्या होत्या गावची ग्रामपंचायत पारदर्शक व गतिमान तसेच स्वच्छतेची बाबतीत कार्यालयातच घाण आढळून येत असेल तर गावच्या स्वच्छतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहे. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने स्वच्छता मोहीम राबवणे गरजेचे असताना ग्रामपंचायत कार्यालयात थुंकल्याने घाणीचे साम्राज्य म्हणजे ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये लोकांकडून अस्वच्छ ठिकाणी थुंकल्यामुळे किंवा इतर अस्वच्छतेमुळे खूप जास्त घाण पसरलेली आहे. याचा परिणाम म्हणून, कार्यालयांमध्ये अस्वच्छता आणि दुर्गंधी पसरते, ज्यामुळे लोकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो.

सविस्तर वृत्त असे की धोंडराई ग्रामपंचायत कार्यालयांच्या भिंती गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी रंगल्या आहे. खर्रा खाऊन अनेक जण खुलेआम भिंतींवर थुंकत आहे. यात कर्मचाऱ्यांसह कामानिमित्त त्या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचाही सहभाग आहे. भिंतीला कान असतात' असे आपण नेहमीच ऐकत आलो. मात्र, खरेच भिंतीला बोलता आले असते तर, गुटखा खाऊन भिंतीवर थुंकणाऱ्यांना नक्कीच भिंतीची बोलणी खावी लागली असती. गुटखाबंदीमुळे भिंतींना तुच्छ लेखून थुंकणाऱ्याची संख्या कमी झाली नाही. अनेक बहाद्दर पान, खर्रा, गुटखा खाऊन भिंतीवर थुंकतात. भिंतीवर थुंकणाऱ्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे भिंतींना थुंकीने लाली चढविली आहे. भिंती मावा व गुटख्याच्या पिचकारीने जागोजागी रंगल्या आहेत. यामुळे कार्यालयात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे.अनेक दिवसांपासून मावा व गुटखा खाऊन पिचकाऱ्या मारलेल्या आहेत तर कार्यालयाच्या भिंतीचे तडे गेल्याचे निदर्शनात आले इतर कार्यालयाला कुलपे लावली आहेत. यामुळे इमारतीच्या अनेक भिंती या लाल रंगाने रंगल्या असून, तेथे अस्वच्छतेने कळस गाठला आहे.



### स्वातंत्र्यदिनानिमित्त पारदर्शी कारभाराची अपेक्षा

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेच्या बाबतीत लक्ष न देता ग्रामपंचायत कार्यालयातील सफाई कर्मचारी जाणूनबुजून दुर्लक्ष करते की काय, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. दुसरीकडे झाडे लावण्यात सर्व कर्मचारी व्यस्त आहेत पण सर्व कार्यालयाच्या प्रमुखांना स्वच्छतेबाबतीत केव्हा जाग येणार, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. कार्यालयामध्ये स्वच्छतेसोबत पारदर्शी कारभार ठेवण्याची नागरिकांची अपेक्षा आहे.

# सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी स्वीकारला अंबाजोगाई उपविभागीय पदाचा पदभार

**बीड । प्रतिनिधी**

सहाय्यक ऋषिकेश शिंदे यांनी पोलीस अधीक्षकांनी उपविभागाचा पदभार स्वीकारला आहे. याचा अर्थ असा की, त्यांनी आता त्या उपविभागातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची, पोलीस ठाण्यांचे पर्यवेक्षण करण्याची आणि तपासाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. हे पद भारतीय पोलीस सेवेतील एक महत्त्वाचे पद आहे. हे अधिकारी जिल्ह्यांमध्ये उपविभागांचे प्रमुख म्हणून काम करतात. त्या भागातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी, तसेच पोलिसांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी जबाबदार असतील. सविस्तर वृत्त असे की ९ जुलैच्या आदेशानुसार आयपीएस ऋषिकेश शिंदे यांचा कालावधी पूर्ण झाल्याने त्यांना सहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून अंबाजोगाई येथे उपविभागीय पदाचा पदभार देण्यात आला. उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून त्यांनी पदभार स्वीकारला आहे आमच्या पदावरून कायद्याने दिलेले अधिकाराचा योग्य वापर करून आमच्या पदासह सर्वसामान्य नागरिकांना योग्य न्याय देऊ सामान्य नागरिकांच्या सेवेत सदैव तत्पर राहू असे मत नवनिर्वाचित अंबाजोगाई उपविभागीय पोलीस अधीक्षक शिंदे यांनी व्यक्त केले आहे.



# रक्तदान करून दिपक भाई केदार यांचा वाढदिवस साजरा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

गोरगरीबांचा कैवारी, अन्यायाचा कर्दनकाळ आंबेडकरी चळवळीतील रत्न ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक भाई केदार यांचा वाढदिवस उपळी या ठिकाणी रक्तदान करून साजरा करण्यात आला, दिपक भाई केदार यांच्या आदेशानुसार सामाजिक उपक्रम राबवून भाईंचा वाढदिवस साजरा करण्यात आला.



जिल्ह्यातील वाढते गुन्हेगारीचे प्रमाण, संतोष देशमुख, महादेव मुंडे, सोमनाथ सुर्यवंशी यांच्या झालेल्या निर्घृण हत्या प्रकरणं, ताजी असताना वाढदिवस साजरा करणार नाही, असे दिपक भाईंने सांगितले होते, परंतु कुठलाही थाटमाट न करता सामाजिक उपक्रम राबवून उपळी येथील दिपक भाई केदार यांचे पँथर ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्हा सचिव वसिम भाई शेख यांच्या संकल्पनेतून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराला उपळी येथील गावकऱ्यांनी तसेच परिसरातील गावच्या लोकांनी चांगला प्रतिसाद दिला. १०५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. शिबीर यशस्वी पार पाडण्यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेचे सचिव वसीम शेख, संजय इचके, आकाश सौंदरमल, दिनेश मोरे, पप्पू शेळके, मनोज घडसिंग, अशोक भाबड, चमन वावळकर, जकिर बाबा, मतिनं भाई, कृष्णा शिंदे, सचिन डोंगरे, आकाश सिरसाठसह ऑल इंडिया पँथर सेनेचे पदाधिकारी, गावकरी व दिपक भाई केदार यांच्यावर प्रेम करणारे लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत सिरसाळ्याचा युवक ठार

### परळी ते सिरसाळा रोडवरील टोकवाडी येथे घडली घटना

**सिरसाळा । प्रतिनिधी**


अज्ञात वाहनाच्या धडकेत सिरसाळ्यातील एक युवक जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे. दिनेश ४ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजताच्या दरम्यान सिरसाळा - परळी रोडवरील टोकवाडी येथे हि घटना घडली आहे.



अजय बाबुराव किरवले वय ४० वर्षे रा. सिरसाळा ता.परळी वैजनाथ असे मयत युवकाचे नाव व पत्ता आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार रात्री १० वाजताच्या दरम्यान संबंधित युवकास एका अज्ञात म्बूलन्स गाडीने धडक दिली. यात त्या युवकाचा जागीच मृत्यू झाला. धडक देणारा वाहन पसार झाले. मयताचे शवविच्छेदन परळी शासकीय रुग्णालयात झाले. काल रात्री १० वाजता कुशीनगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले असा परिवार आहे.




आज मंगळवार दिनांक ०५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता नामदार भरतजी गोगावले मंत्री रोजगार हमी व फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती दालनात रोजगार हमी योजनेचे सचिव व कक्ष अधिकारी यांच्या सोबत गणेश काळे, रज्जाक शेख व बाजीराव ढाकणे यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील ग्रामसाधन व्यक्तीच्या अडचणी संदर्भात चर्चा झाली. मंत्री महोदय यांनी असे आश्वासन दिले आहे की राज्य निधी उपलब्ध करून देण्यात येईल व राज्यातील सर्व ग्राम साधन व्यक्तींचे मुल्यमापन करून वर्षात जास्तीत जास्त काम उपलब्ध करून देण्याचा विचार केला जाईल असे सांगितले. शेवटी ना. भरतजी गोगावले यांनी राज्यातील ग्राम साधन व्यक्तींनी आपल्या राज्याचं काम दर्जेदार आणि नियोजनबद्ध पद्धतीने करावं मी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन दिले आहे.



वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे चिरंजीव आमचे मित्र मा.नवीद मुश्रीफ चेअरमन कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ (गोकुळ) युवराज पाटील संचालक कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ, किसनराव चौगुले राधानगरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अध्यक्ष, शशिकांत पाटील संचालक कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ मनोज फराकटे व्हाईस चेअरमन बिद्री साखर, विकासराव पाटील अध्यक्ष कागल तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मयूर आवळेकर कागल तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष, निलेश शिंदे जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व तसेच विकास हंबीरराव पाटील आमचे मित्र हे बीड वरून जात असताना छत्रपती संभाजी महाराज चौक येथे त्यांची भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मी व मित्रपरिवार.

# उद्या उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी परिसरात होणार वृक्षारोपण

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरण रक्षण व हरितक्रांतीचा संदेश देणाऱ्या 'हरित बीड अभियानां 'तर्गत जिल्ह्यातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे . येत्या ७ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात वृक्षारोपण होणार आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश एक दिवसात ३० लाख वृक्षारोपणाचा संकल्प असून, या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी जिल्हा प्रशासन, विविध विभाग, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचे सक्रिय योगदान अपेक्षित आहे.

या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान, रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी प्रबोधय मुळे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि अन्य सर्व विभागांचे अधिकारी-कर्मचारी सज्ज आणि कटिबद्ध आहेत. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात एक ऑगस्ट रोजी सायंकाळी सर्व विभाग प्रमुख यांची जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठक घेतली. बैठकीस जिल्हा कृषी अधिकारी, सर्व तालुका कृषी अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी, सर्व मुख्याधिकारी, सर्व तहसीलदार उपस्थित होते.



यावेळी बोलताना जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की बीड जिल्हा हा तसा ओरडवाहू जिल्हा आहे. पावसाचे प्रमाण कमी आहे. जंगलाचे प्रमाण अत्यल्प आहे. अशा परिस्थितीत झाडे लावणे आणि झाडे जगवणे ही प्रत्येकाची प्राथमिक जबाबदारी ठरते. प्रत्येक विभागाने झाडे लागवडीचे नियोजन करावे. रोपे कुठून आणावीत, कशा पद्धतीने ती पोहोच करावीत, रोपे लावण्यासाठी खड्डे करण्याचे नियोजन कसे करावे, तसेच प्रत्येक रोप लावल्यानंतर क्यू आर कोड द्वारे कशाप्रकारे रजिस्ट्रेशन करावे याबाबत त्यांनी सविस्तर सूचना दिल्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांनी सर्व गटविकास अधिकारी यांनी ग्राम पातळीवर विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. तसेच पुढील कालावधीत खड्डे खोदणे आणि रोपे पोहोच करणे इत्यादी कामे करून घेणार असल्याचे नमूद केले.

या अभियानाची एक विशेषता म्हणजे एक पेड माँ के नाम हा भावनिक आणि सामाजिक संदेश. पर्यावरणाचे रक्षण करताना आपल्या मातेच्या स्मृतीस वंदन करणारा हा संकल्प विद्यार्थी व नागरिकांमध्ये चांगलाच रुजतो आहे. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविता येईल यासाठी त्यांची सर्व यंत्रणा कार्यान्वित केली आहे. स्वतः त्यांनी पालवन येथील वनविभागाच्या जागेस गुरुवारी भेट दिली. तेथे सुरू असलेल्या खड्डे खोदण्याच्या कामाची पाहणी केली. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी देविदास गाडेकर व त्यांचे सहकारी उपस्थित होते. देविदास गाडेकर यांनी नमूद केले की आम्ही येथे रोपे आणून सात तारखेला वृक्षारोपण करणार आहोत.

बीड जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये हजारो ठिकाणी वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात येणार असून, त्यासाठी नियोजन, जागा निवड, रोपांची उपलब्धता आणि जनजागृती यावर भर देण्यात आला आहे. हरित बीड अभियान २०२५ हे केवळ वृक्षारोपणापुरते मर्यादित नसून, ते जिल्ह्याच्या दीर्घकालीन हरित विकासाचा पाया ठरणार आहे. पर्यावरण संवर्धनाची ही चळवळ लोकसहभागातून यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

पान १ वरून...

## मातोरी ते भगवानगड रोड वर वाळूने भरलेला टिपर पकडला

येळे १५३३ हे रात्री पेटोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली की, मातोरी रोड वरून घोगस्परगाव चौकात ठिकाणी टाटा कंपनी चे वाळू ने भरलेला टिपर मातोरी ते भगवानगड रोड वर जात आहे त्या ठिकाणी तत्काळ त्या ठिकाणी गेले असता वाळू ने भरलेला टिपर चक १७उत१८९१ आढळुन आला टिपर चालक नवनाथ प्रल्हाद खोपडे रा मुंगी तालुका शेवगाव जिल्हा अहिल्यानगर यांच्या वर चकलंबा पोलीस ठाण्यात गु. र.न २८४/२५ कलम ३०३(२) भा. न्या.स प्रमाणे ही कारवाई पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक राजेश गडवे यांनी ही कारवाई करण्यात आली आहे त्याच्या दोन दिवसात दोन कारवाई मुळे त्याचे चकलांबा परिसरातून अभिनंदन होत आहे.

## महादेव मुंडे हत्या प्रकरणी माहिती असेल तर कळवा

मैदानात हत्या झालेली असून सदर प्रकरणा संबधाने पोलीस ठाणे परळी शहर येथे अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा रजिस्टर नं.१९१/२०२३ कलम ३०२. भां.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

या गुन्ह्यातील आरोपीतांचा अद्याप शोध न लागल्याने पंकज कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी गठित करण्यात आली असून या पथकाने पुढील तपास सुरु केलेला आहे. महादेव दत्तात्रय मुंडे यांच्या हत्ये बाबत काही माहिती असल्यास पंकज कुमावत यांनी त्यांचा वैयक्तिक मो. ९९९०७८२४३१ जाहीर करुन माहिती देण्याचे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. माहिती देणाऱ्यास उचित बक्षीस देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

## चोरी गेलेले टाटा मॅजिक टेम्पो २४ तासाच्या आत जप्त

घेऊन माजलगाव हुन गावा कडे जात होते या दरम्यान ते माजलगाव ग्रामीण हद्दीतील परभणी फाटा येथील एका हॉटेल मध्ये चहा पित असताना कोणी तरी अज्ञात आरोपींने सदरील टेम्पो (१५ लाख व ४ चार हजाराचे २ मोबाईल असा एकूण १५,४,००० मुद्देमाल) चोरी करून घेऊ गेल्याची तक्रार दि ३ ऑगस्ट २०२५ रोजी ग्रामीन पोलिसांत दिली होती. सदरील तक्रारीची दखल घेऊन गोपनीय बातमीदारा मार्फत काल दि ४ ऑगस्ट २०२५ रोजी स १० वा माहिती घेतली असता सदरील टाटा मैजिक हा माजलगाव ग्रामीण पोलीस च्या हद्दीतील पुरुषोत्तमपुरी येथे अज्ञात आरोपी घेऊन आल्याची माहिती मिळाल्यावरून पोलीस कर्मचारी त्या ठिकाणी गेले असता सदरील आरोपीने टाटा मॅजिक जागेवरच सोडून पळून गेला सदरील वाहनाचा जप्ती पंचनामा करून केवळ २४ तासाच्या आत ते वाहन जप्त करून ग्रामीण पोलीस ठाणे येथे लावण्यात आले आहे.

यातील आरोपी चा पोलीस शोध घेत आहेत. सदरील कार्यवाही एपीआय पांडव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय निंबाळकर, पीएसआय चव्हाण, एएसआय बळवंते, पोह उद्धव राऊत, पोह राठोड, पोअ अडगळे यांनी कार्यवाही केली. ग्रामीण पोलिसांच्या या धडाकेबाज कार्यावहीचे सर्व स्तरातील नागरिक स्वागत करत आहेत तर मूळ टेम्पो मालक यांनी या कार्यवाही बद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## केजमधील रेणुका कलाकेंद्रावर छापा

मीना संतोष खराडे (वय ४० वर्षे रा.जुना धानोरा रोड, जीजाऊ नगर, संत कबीर गल्ली बीड) असे सांगितले. सदर महिलेची झडती घेतली असता डमी ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या १५ नोटा मिळून आल्याने पंचासमक्ष जप्त केल्या.

सदर ठिकाणी दोन पीडित महिला मिळून आल्या. पीडीत महिलांना विश्वासात घेवून चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, मीना संतोष खराडे आणि तिचा सहकारी शेख शफीक शेख हमीद (वय ३१ वर्ष रा. कुर्बाण अलिशा नगर, दर्गा रोड परभणी), जागा मालक रामनाथ ढाकने (फरार, वय ५९ रा. सारूळ) यांनी एका पीडीत महिलेस गुजरात वरून तर दुसरीस बाहेर जिल्ह्यातून आणून, स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. आरोपी मीना संतोष खराडे हिची दोन पंचा समक्ष झडती घेतली असता, तिच्याकडे डमी ग्राहकाने दिलेल्या १५ नोटा व इतर साहित्य मिळून आले आहे. तिन्ही नमुद आरोपींवर पीडीत महिलांना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांना आणून स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास गात नियंत्रण कक्ष, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव, सहायक पोलीस उप निरीक्षक मीरा रेडेकर, महीला पोलीस हवालदार उषा चौरे, शोभा जाधव, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर, योगेश निर्धार सर्व नेमणूक अ.मा.वा.प्र.कक्ष यांनी केली.

# मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा!

### सुनील ठोसर यांच्या संकल्पनेतून उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस यंदा सामाजिक भान जपत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वाढदिवसानिमित्त सुनील ठोसर यांच्या पुढाकारातून रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप आणि गरीबांना अन्नदान असे विविध उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमात युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत जनसेवेचा संदेश दिला. मनोज जरांगे पाटील यांच्या कार्याने प्रेरित होऊन त्यांच्या वाढदिवशी समाजहिताचे उपक्रम राबवले गेले, ही गोष्ट विशेष ठरली.

कार्यक्रमावेळी सुनील ठोसर यांनी सांगितले की, जरांगे पाटलांनी मराठा समाजासाठी घेतलेला लढा आज प्रेरणादायी आहे. त्यांच्या वाढदिवसाचा उत्सव गाजवण्यापेक्षा समाजासाठी काही करण्यावर आमचा भर होता. या उपक्रमामुळे मनोज जरांगे पाटील यांच्या कार्याचा सामाजिक प्रभाव अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.



सामाजिक कार्य आणि जनहितासाठी झटणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस अशा प्रकारे उपयुक्ततेत रूपांतरित झाला, ही गोष्ट समाजात सकारात्मक ऊर्जा पसरवणारी ठरली. या उपक्रमांना ग्रामीण भागातील नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. वाढदिवस म्हणजे केवळ केक कापणे किंवा फलक लावणे नव्हे, तर समाजासाठी काहीतरी उपयोगी करण्याची संधी, असा सकारात्मक संदेश यानिमित्ताने दिला गेला. या अभिनव उपक्रमामुळे वाढदिवस साजरा करण्याची नवी दिशा निर्माण झाली असून, युवकांनी त्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहनही करण्यात आले.

### गेवराई तालुक्यात गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व सायकल वाटप

गेवराई तालुक्यातील सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य व सायकल वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. ग्रामीण भागातील शिक्षणात अडथळा ठरणाऱ्या आर्थिक अडचणी लक्षात घेता, या उपक्रमाने विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळाला आहे. या उपक्रमांतर्गत शालेय दप्ती, वह्या, पेन, दप्तर यासह काही विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी सायकलचे वाटपही करण्यात आले. विद्यार्थ्यांचे पालक आणि शिक्षकांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थी शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी सक्षम झाले असून, शिक्षणात सातत्य टिकवण्यासाठी मोठा हातभार मिळाला आहे. सामाजिक जाणीवेतून उभा राहिलेला हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरतो आहे.

# लोकशाहीमध्ये सत्ताही आयुष्यभराची कोणाचीच नसती सर्वसामान्यांची कामे अडवण्याचे पाप कोणीही करू नये : माजी आ.भीमराव धोंडे

## राजकारणात एकमेकांच्या विरोधात असावं परंतु कुटीलपणा असू नये निवडून आलेल्यांनी सुद्धा याची जाण ठेवली पाहिजे : माजी आ.दरेकर

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे माजी आमदार शिक्षण महर्षी भिमरावजी धोंडे साहेब यांचा अभिष्टचिंतन सोहळा व कार्यकर्ता बैठक मेळावा दि:०५/०८/२०२५ रोजी आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालयात अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना लोकशाही मध्ये सत्ताही आयुष्यभराची कोणाचीच नसती बदलत असते मतदार संघातील सर्वसामान्यांची कामे अडवण्याचे पाप कोणीही करू नये असे मत माजी आमदार भीमरावजी धोंडे यांनी व्यक्त केले.




मोरेश्वर मंगल कार्यालय आष्टी येथे अजय दादा धोंडे मित्र मंडळ आष्टी पाटोदा शिरूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला अभिष्टचिंतन सोहळा व कार्यकर्ता मेळावा पार पडला. यावेळी प्रमुख उपस्थिती आष्टी पाटोदा मतदार संघाचे माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, अजय दादा धोंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, पंचायत समिती सभापती सुवर्णाताई लांबरुड, रिपाइं तालुका अध्यक्ष अशोक साळवे, ॲड रत्नदीप निकाळजे, पांडुरंग गावडे, राजपाल शेंडगे, सुरेश राख, माऊली पानसंबळ, सरपंच दादासाहेब जगताप, शिवाजी सुरवसे, महारुद्र खेडकर, बबन औटे, बबन सांगळे, ॲड. दहातोंडे यास अनेक कार्यकर्त्यांनी कार्यकर्त्यांना यावेळी मार्गदर्शन केले व वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शुभेच्छा देताना माजी आमदार दरेकर नाना म्हणाले की धोंडे साहेब आणि आम्ही एकमेकांच्या विरोधात असताना कधीही दोस्तीत अंतर येऊ दिले नाही. राजकारणात एकमेकांच्या विरोधात असावं परंतु कुटीलपणा असूनये निवडून आलेल्यांनी सुद्धा याची जाण ठेवली पाहिजे मी राजकारणात अनेकांना मदत केली मतदार करणाऱ्यांना व निवडून आणणाराला किंमत नसते परंतु चमचेगिरी करणाराला किंमत असते अशी परिस्थिती आजच्या राजकारणात आहे, असे मत यावेळी माजी आमदार दरेकर नाना यांनी व्यक्त केले.

यावेळी अजय दादा धोंडे यांनी युवकांना मार्गदर्शन करत असताना सांगितले की येत्या दोन-तीन महिन्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक लागणार असून युवकांनी एकजुटीने एक दिलाने कामाला लागा निवडून आणायचे काम आमच्यावर सोडून द्या. आपल्याला जास्तीत जास्त जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य निवडून आणायचे आहेत. तेव्हा युवकांनी आत्तापासूनच एकजुटीने कामाला लागले पाहिजे असे मत युवा नेते अजय दादा धोंडे यांनी व्यक्त केले. यावेळी मार्गदर्शन करत असताना माजी आमदार भीमरावजी धोंडे यांनी सांगितले की आपण आज पर्यंत कधीही अरेरावी व धामधुमीचे राजकारण केलं नाही. फक्त आणि फक्त मतदार संघाचा विकास पाहिला मतदार संघातील गोरगरीब शेतकऱ्यांचे मुले शिक्षणासाठी बाहेरगावी न जाता मतदार संघातच प्रत्येक क्षेत्रातील उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे याच्यासाठी आपण शिक्षण संस्था काढल्या. येत्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये आपल्याला योग्य न्याय मिळाला नाही तर आपण लवकरच सर्व कार्यकर्त्यांना विचारात घेऊन योग्य तो निर्णय घेणार असे मत यावेळी बोलताना माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब यांनी व्यक्त केले. अभिष्टचिंतन सोहळा व कार्यकर्ता मेळाव्याचे प्रास्ताविक सुदाम काका झिंजुर्के यांनी केले. यावेळी आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिपाई ते सहाय्यक महसूल अधिकारी; शेख बाबर यांची कौतुकास्पद कामगिरी : एस.एम. युसूफ

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या पाटोदा तालुक्यातील पारगाव घुमरा येथील रहिवासी असलेले शेख बाबर यांनी शिपाई पदापासून केलेली सुरुवात त्यांच्यातील कर्तव्यदक्षतेमुळे



त्यांना सहाय्यक महसूल अधिकारी पदापर्यंत घेऊन गेली आहे. त्यांची ही कामगिरी कौतुकास्पद असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी म्हटले आहे. शेख बाबर महेबूब यांचा आतापर्यंत महसूल विभागाचे कनिष्ठ कर्मचारी ते सहाय्यक महसूल अधिकारी असा प्रवास झालेला आहे. ते मूळचे पारगाव घुमराचे रहिवासी आहेत. त्यांची सन २०१२ साली चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून प्रथम आष्टी तहसील कार्यालयात नियुक्ती झाली होती. त्यांच्यात असलेल्या कर्तव्यतत्परतेमुळे त्यांना अवघ्या चारच वर्षात म्हणजे २०१६ साली लिपिक म्हणून बढती मिळाली. या पदावर ही त्यांनी चमकदार कामगिरी केल्यामुळे पाटोदा उपविभागीय कार्यालयात कार्यरत असताना २०२३ साली सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून त्यांना पदोन्नती मिळाली. उपविभागीय कार्यालयात कार्यरत असताना प्रशासकीय कामकाज करताना त्यांनी सतत समाजसेवी भावनेतून कर्तव्य बजावले. सतत झोकून देऊन काम करण्याची वृत्ती यामुळे त्यांच्या कामाची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली आणि २०२४-२५ या वर्षासाठी उत्कृष्ट काम केले म्हणून जिल्हाधिकारी यांनी त्यांना सन्मानित केले. तसेच उपविभागीय अधिकारी शेख वसीमा तहसीलदार यांनीही त्यांचा यथोचित सन्मान केला. अशाप्रकारे आपल्या बीड जिल्ह्याच्या भूमिपुत्राने शासकीय कार्यालयात शिपायापासून ते अधिकारी होण्यापर्यंत मारलेली मजल आणि त्यांचा जिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी केलेला सन्मान कौतुकास्पद असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी म्हटले आहे.

# लोकशाही पत्रकार संघाच्या कायदे सल्लागारपदी ॲड. सुप्रिया गिरी तर डिजिटल मीडिया मराठवाडा अध्यक्षपदी उद्धव मोरे, डिजिटल मीडिया बीड तालुका अध्यक्षपदी आनंद मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

आज रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या बैठकीमध्ये लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष उपाध्यक्ष जाधव प्रताप साळुंखे प्रदेश सचिव गणेश जगदाळे प्रदेश उपाध्यक्ष साजत सय्यद अनिस कुरेशी अशी माझा वसीम आझाद महिला प्रदेश उपाध्यक्ष यांच्या आदेशाने बीड जिल्हा संघटक संजय देवा कुक्कडगावकर यांनी मराठवाडा अध्यक्ष महिला आघाडी कायदे सल्लागारपदी बीड जिल्हा सत्र न्यायालय मध्ये लेडी सिंघम म्हणून सर्वत्र परिचित असलेल्या अशा एडवोकेट सुप्रिया गिरी मॅडम तर डिजिटल मीडिया मराठवाडा अध्यक्षपदी उद्धव मोरे तर डिजिटल मीडिया तालुका अध्यक्षपदी आनंद मुंडे आणि सामाजिक कार्य विकास समितीच्या मराठवाडा अध्यक्षपदी राजेंद्र सोनवणे यांच्या निवडी आज रोजी म्हणजेच मंगळवार दिनांक ५ रोजी जाहीर करण्यात आल्या.



या निवडी जाहीर केल्यानंतर आपापले थोडक्यात मनोगत व्यक्त करताना जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळकर यांनी सांगितले की, आता लोकशाही पत्रकार संघाचे जाळे संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये नव्हे तर महाराष्ट्रमध्ये चांगल्या प्रकारे विणण्याचे काम सर्व पदाधिकारी करत असल्याच्या बाबतीत समाधान व्यक्त केले. आणि निवडी झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना जिल्हा अध्यक्ष यांनी पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांनी बीड जिल्ह्यामध्ये चांगल्या प्रकारे लोकशाही पत्रकार संघाचे संघटन वाढवण्याचे कार्य ते करत असल्याच्या बाबतीत जिल्हा अध्यक्ष व संस्थापक अध्यक्ष यांनी समाधान व्यक्त केले व संजय देवा कुलकर्णी यांनी निवडी झालेल्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आणि यानंतर एडवोकेट श्रीकांत जाधव साहेब यांनी देखील पत्रकार संघाला कायद्याच्या अभ्यासू लॉयर वकिलाची गरज असल्याचे सांगितले आणि ती गरज आज लोकशाही पत्रकार संघाला एक उत्कृष्ट अभ्यासू व्यक्ती एडवोकेट सुप्रिया गिरी मॅडम या लाभल्यामुळे एडवोकेट जाधव यांनी समाधान व्यक्त केले आणि सुप्रिया गिरी यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या तसेच पत्रकार क्षेत्रामध्ये गेल्या पंधरा वर्षापासून आपल्या कार्याचा ठसा उमटून सर्वसामान्य लोकांना शासन प्रशासन दरबारी न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे असे सर्व महाराष्ट्र मध्ये नाव लौकिक केलेले असे पत्रकार उद्धव मोरे यांना देखील डिजिटल मीडियाच्या मराठवाडा अध्यक्षपदी संस्थापक अध्यक्ष यांनी त्यांची निवड जाहीर केली. तसेच त्यांच्या समवेत असलेले आनंद मुंडे यांची डिजिटल मीडिया बीड तालुका या पदावर निवड करण्यात आली तसेच सामाजिक कार्याच्या मराठवाडा अध्यक्षपदी राजेंद्र सोनवणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडी केलेल्या सर्व पदाधिकाऱ्याचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य यांनी मनस्वी भरभरून स्वागत केले व त्यांना पुढील कार्यासाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी येथे उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे पदाधिकारी तसेच बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हाळ यानी केले तर आभार परदर्शन साजेद सय्यद यानी मानले आणि हा पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहामध्ये शासकीय विश्रामगृह याठिकाणी संपन्न झाला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकशाही पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.



# इंदिरा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

आज दि.५ रोजी इंदिरा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय नगर रोड बीड या शाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्माण होण्यासाठी इंग्रजी विषयाचे तज्ञ श्री कोकणे सर यांचे मार्गदर्शन लाभले या मार्गदर्शनामध्ये त्यांनी इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना कशाप्रकारे इंग्रजी विषयाचे अध्ययन करावे, सोपे सोपे शब्द पाठांतर करून आपण इंग्रजी विषयांमध्ये कशा प्रकारे प्रगती करू शकतो तसेच इंग्रजी मध्ये वाक्यरचना कशी करावी, इंग्रजी विषयांमध्ये अध्ययन करताना विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या चुका याबाबत अनमोल असे मार्गदर्शन केले.

निश्चितच आमच्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना आज रोजी इंग्रजी विषयाचे लाभलेले मार्गदर्शन हे उपयोगी पडणार आहे. त्याबद्दल श्री कोकणे सर यांचे शाळेच्या वतीने आभार. या आजच्या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव कागदे हे लाभले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानसागर गुरुकुल चे संचालक सानप या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण कोकणे हे लाभले होते, तसेच या कार्यक्रमासाठी शाळेचे प्रा. विभागाचे मुख्याध्यापक कदम, माध्यमिक विद्यालया च्या मुख्याध्यापिका श्रीमती टेकाळे मॅडम व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व विद्यार्थी हे मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



# धामणगाव येथे साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील धामणगांव येथे सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील साहित्यरत्न लोकशाहिर आण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती निमित्त प्रतिमेची वाजत गाजत मिरवणूक काढत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

धामणगांव ता.आष्टी येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील आण्णाभाऊ साठे याच्या जयंतीचे आयोजन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संतोष कांबळे याच्या पुढाकारातून नियोजन मंगळवारी सायंकाळी करण्यात आले होते. सजावलेल्या रथावर आण्णाभाऊ साठे याची प्रतिमा ठेऊन शहरातून पारंपारिक वाद्यातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी धामणगांवसह परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर याची उपस्थिती होती. जयंतीचे अध्यक्ष संतोष कांबळे व जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी यांनी जयंती उत्सव पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. अंभोरा पोलिसांचा चोख बंदोबस्त पार पाडला.

# सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) ट्रेड सुरू

## शासकीय आयटीआय आष्टी येथे प्रवेशासाठी संधी

**कडा । प्रतिनिधी**

श्री गुरुलिंग स्वामी जीबकाटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आष्टी येथे आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगाशी सुसंगत असा सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) एक वर्ष कालावधीचा हा नवा ट्रेड प्रवेश सत्र २०२५ पासुन सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी संस्थेला प्रत्यक्ष भेट देऊन अधिक माहिती घ्यावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



सध्या संपूर्ण जग पारंपरिक ऊर्जेच्या स्रोतांवरून नूतनीकरण योग्य ऊर्जा स्रोतांकडे वळत आहे. यामध्ये सौरऊर्जा हा एक महत्त्वाचा, स्वच्छ आणि शाश्वत पर्याय मानला जातो. भारत सरकारच्या हर घर सौर योजनेच्या पार्श्वभूमीवर देशात सोलर टेक्निशियनची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना सौर उर्जेची मूलतत्त्वे, सोलर पॅनलची बसवणी, देखभाल व दुरुस्ती, इलेक्ट्रिकल कनेक्शन यांची सखोल माहिती दिली जाते. त्यामुळे विद्यार्थी स्वतंत्र सोलर इंस्टॉलर, मेंटेनन्स टेक्निशियन, प्रोजेक्ट असिस्टंट अशा विविध पदांवर काम करू शकतात. याशिवाय कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधीही मिळते.

शासकीय आयटीआय आष्टी ही संस्था ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख शिक्षणाचा एक महत्त्वाचा केंद्रबिंदू बनली आहे. नव्याने सुरू झालेल्या सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) या ट्रेडमुळे या भागातील युवकांना उज्वल भविष्यासाठी एक नवा मार्ग उपलब्ध झाला आहे. अधिक माहितीसाठी किंवा प्रवेश अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी शासकीय आयटीआय आष्टी येथे तात्काळ संपर्क साधावा.

# श्री सोमेश्वर मंदिर येथे श्रीमद् भागवत कथेचे आयोजन

## बीड शहरातील भाविक भक्तांनी कथा श्रवणाचा लाभ घ्यावा : नवनाथ शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी श्रीमद् भागवत महा कथेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्रीमद् भागवत कथा



श्रवण करून आपल्या जीवनाचा उद्धार करून घ्यावा, असे आवाहन श्री सोमेश्वर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा विश्वस्त नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

या कथेसाठी कथाकार म्हणून हरिभक्त परायण नारायण महाराज गिरी यांच्या वाणीतून ही कथा दिनांक ७/८/२०२५ रोजी पासून संपन्न होणार आहे असे आवाहन करण्यात आले आहे. ही श्रीमद् भागवत कथा हरिभक्त परायण महादेव महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर तसेच हरिभक्त परायण शिवाजी महाराज श्रीक्षेत्र नारायण गडकर यांच्या आशीर्वादाने संपन्न होत आहे. तरी बीड शहरातील सर्व भाविक भक्तांनी ही श्रीमद् भागवत कथा श्रवण करण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष नवनाथ अण्णा पाटील यांनी केले आहे.

# समाज गौरव पुरस्काराने प्रियंका लांडगे सन्मानित

**केज । प्रतिनिधी**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव केंद्रीय समिती दिल्ली यांच्या वतीने दिला जाणारा समाज गौरव राष्ट्रीय पुरस्कार यावर्षी



केज जिल्हा बीड येथील समाजसेविका लहुजी शक्ती सेनेच्या महिला बीड जिल्हा अध्यक्ष प्रियांका ताई लांडगे यांना प्रधान करण्यात आला. हा पुरस्कार दिनांक ०५ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते प्रधान करण्यात आला.

यावेळी भाजप अनुसूचित जाती मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष लालासिंह आर्या, लातूर लोकसभेचे माजी खासदार डॉ.सुनील गायकवाड, राज्यसभेचे खासदार अनिल बोंडे, माजी आमदार राम गुंडुळे, सुभाष दाजी पवार आदी मान्यवर उपस्थित होते. गेल्या दहा पंधरा वर्षापासून प्रियंका ताई लांडगे सामाजिक चळवळीत सक्रिय असून अनेक आंदोलन मोर्चे उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजाच्या विविध प्रश्नांवर काम केले आहे. त्यांच्या या योगदानाचा गौरव म्हणून त्यांना समाज गौरव राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



# बुद्ध विहार सिरसाळा येथे भंते डॉ. एम. सत्यपाल यांची प्रेरणादायी धम्मदेशना

**सिरसाळा । प्रतिनिधी**

सम्राट अशोक बुद्ध विहार, सिरसाळा येथे पूज्य भंते डॉ. एम. सत्यपाल यांची प्रेरणादायी धम्मदेशना संपन्न झाली. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांना अभिवादन व त्रिसरण पंचशील घेऊन करण्यात आली. प्रसंगी भंते डॉ एम सत्यपाल यांनी बुद्ध, धम्म व संघ या त्रिरत्नांवरील श्रद्धेचे महत्व विशद केले. संस्कारातून संस्कृतीची निर्मिती होते या मूलमंत्रावर त्यांनी उपासक-उपासिकांना मार्गदर्शन केले आणि दहा पारमिता पाळण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. दयानंद झिंजुर्डे यांनी केले. सूत्रसंचालन बौद्धाचार्य साहेबराव किरवले यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपा. सुभाष लिंबाजी चोपडे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व यशोधरा महिला मंडळ, सिरसाळा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाला रामदादा किरवले, प्रमोद भाऊ किरवले, मधुकर नाना किरवले, सचिन रणखांबे, विलास बनसोडे, गायसमुद्रे बप्पा, डॉ. महेंद्र उजगरे, बाबासाहेब किरवले तसेच अनेक उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा धारूर येथे इंडिया बँकेचे शाखा व्यवस्थापक निलेश वाडिया यांचा सत्कार



**धारूर । प्रतिनिधी**

स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा धारुरचे शिस्तप्रिय मनमिळाऊ शाखा व्यवस्थापक निलेश वाडिया यांची बदली गुजरात राज्यात झाली असून त्यांना निरोप म्हणून जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा धारुर मध्ये भव्य सत्कार समारंभ घेण्यात आला. यावेळी बोलताना निलेश वाडिया यांनी किल्लेधारुर मधिल नागरिक व तालुक्यातील खेडेगावातील ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्या बद्दल आभार मानले.

ग्राहकांना योग्य वेळेत सुविधा दिल्या तसेच त्यांची वेळेवर कामे केली त्यांनीही तसाच मान दिला. मि माझे काम धारूर तालुक्यातील जनतेच्या सहकार्याने करु शकलो. यावेळी जिल्हा बँक शाखा धारुरचे शाखाधिकारी अशोक उजगरे, रोखपाल प्रेमानंद तोडेवाड, टिसिओ महादेव गव्हाणे, सेवा सोसायटीचे सचिव विष्णू रंदवे, दिनेश गायकवाड, बँक कर्मचारी जि. एस. गणाचारी, खंडू साखरे, आसरडोहचे माजी सरपंच गिन्यानदेव काचगुंडे, धारुर खरेदी विक्री संघाचे संचालक राम प्रभू मुंडे तसेच शेतकरी उपस्थित होते.

